जा.क्र.उमा१/कोवि/संचम मान्यता/२०२२/ 7724
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर
दिनांक- 10 OCT 2022

प्रति,
प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालये
(अनुदानित/विनानुदानित/कायम विनाअनुदानित/स्वंयअर्थसहाय्यित शाळा,२० टक्के पात्र घोषित शाळा)
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

विषय – सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यतेबाबत
सर्व प्रकारच्या मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविदयालये.
संच **मान्यता शिबीर २०२१-२२**

संदर्भ- १) मा. शिक्षण संचालक, माध्य व उच्च माध्य शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिसं/संचमान्यता/२०२२/८२७, दि. ४/३/२०२२
२) शालेय शिक्षण विभाग शासन पत्र दि. ९/६/२०२२ व दि. १३/६/२०२२
३) या कार्यालयाचे पत्र क्र. २३२५, दि. २१/३/२०२२

सन २०२१-२२ ची उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालयांची संच मान्यता करणेबाबतच्या सूचना संदर्भ क्र. १ व २ नुसार देणेत आलेल्या आहेत.

सबब, या विभागातील सन २०२१-२२ ची उच्च माध्यमिक शाळा/ क.म.वि. च्या संच मान्यता गतवर्षीप्रमाणे संगणकीय पध्दतीप्रमाणे (**रिया इन्फोटेक, कोल्हापूर**) करणेत येणार आहे. यानुसार संच मान्यता करणेसाठी खाली दिलेल्या संकेतस्थळावर आपल्या कनिष्ठ महाविदयालयाची /उच्च माध्यमिक शाळेची माहिती भरणेत यावी. सदर माहिती भरताना खालील सर्वसाधारण सूचना विचारात घ्याव्यात.

संकेतस्थळ- www.dydekop.org
युजर आयडी- शाळेचा युडाएस
पासवर्ड- शाळेचा युडाएस

१) सदरचे संकेत स्थळावर सर्व संबंधित शाळांनी आपली माहिती शाळेच्या अनुदान प्रकाराप्रमाणे परिपूर्ण भरुन घ्यावी. अपूर्ण, चुकीची माहिती भरु नये.
२) सदरची माहिती भरताना सन २०१८-१९/२०१९-२०/२०२०-२१ च्या संच मान्यतेनुसार मंजूर विषय व या विषयांना मंजूर तुकडया व कार्यभार याप्रमाणे भरावी. तसेच विषयनिहाय माहिती भरताना सन २०२०-२१ मध्ये त्या विषयाला मंजूर असणा-या तुकडया इतकीच माहिती भरावी. विषयासाठी तुकडी संख्येत वाढ करु नये. यामुळे कोणताही कार्यभार व पद वाढणार नाही याची दक्षता घ्यावी.
३) विषयनिहाय मंजूर पदे व प्रस्तावित पदे यांची अचूक माहिती भरावी.
४) सन २०१०-११ अखेरची वाढीव पदे मंजूर झाली आहेत यापैकी ज्या पदावर कार्यरत शिक्षकांच्या मान्यता झालेल्या आहेत अशी पदे मंजूर पदामध्ये येतील. उर्वरीत वाढीव मंजूर पदापैकी वैयक्तिक मान्यता न झालेली राज्यातील ४२८ पदे शासन निर्णय दिनांक ९/४/२०१८ नुसार व्यपगत झाली असून सदरची पदे पुन्हा पद मंजूरीसाठी प्रस्तावित करणेत आलेली आहेत. या पदांची माहिती संबंधित उच्च माध्यमिक शाळेच्या माहितीमध्ये समाविष्ट करणेत आलेली आहे. अशा पदावर नव्याने नियुक्त्या करता येणार नाहीत.
५) शासन निर्णय दि. २३/६/२०१७ नुसार सर्व पदे पवित्र प्रणाली मधून भरावयाची असलेने नव्याने कोणत्याही नियुक्त्या (सी.एच.बी. / स्वंयअर्थसहा.वगळता) करता येणार नाहीत. त्यामुळे अशा नियुक्त उमेदवारांची नावे संच मान्यतेमध्ये समाविष्ट करता येणार नाहीत.
६) सन २०११-१२ ते २०१३-१४ ची प्रस्तावित पदे अदयाप मंजूर नसलेने ती प्रस्तावित पदामध्ये वर्षनिहाय दर्शविणेत आलेली आहेत.
७) सन २०२०-२१ च्या संच मान्यतेमध्ये कार्यभारानुसार येणारी पूर्णवेळ व अर्धवेळ पदे ही सन २०१९-२० च्या संच मान्यतेमधील पूर्णवेळ व अर्धवेळ पदाशी तुलनात्मक पडताळून कमी/जादा होत असलेस त्याची खातरजमा करावी. सन २०१३-१४ नुसारची पदे (विशेषतः अनुदानितसाठी) ग्राहय धरणेत येतील. यामध्ये सन २०१४-१५/२०१५-१६/२०१६-१७/२०१७-१८/२०१८-१९ व २०१९-२० ची पटसंख्येनुसार/इतर कारणाने वाढीव होणारी पदे (अनुदानितसाठी) ग्राहय धरलेली नाहीत व त्यामुळे सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत वाढीव प्रस्तावित पदे नाहीत.
८) सन २०२१-२२ वाढीव होणारी पदे प्रस्तावित केली जातील तथापि सदर पदावर शिक्षक नियुक्ती करता येणार नाही याची नोंद घ्यावी. पद प्रस्तावित करावयाचे असल्यास संच मान्यतेमध्ये प्रस्तावित पद दर्शविलेनंतर तसा

संस्था ठराव, मुख्याध्यापकांचे पत्र, पद प्रस्तावित/वाढीव होण्याचे कारण इ. बाबी सह स्वतंत्र प्रस्ताव संच मान्यतेनंतर सादर करावा. अन्यथा शासनाकडे सदर प्रस्तावित पदाची माहिती सादर केली जाणार नाही.

९) शासन व शिक्षण संचालक यांचे सूचनेनुसार, अतिरिक्त विषय मान्यतेमुळे आर्थिक भार येत असलेने अनुदानित व विनाअनुदानित कडे कोणताही अतिरिक्त विषय सुरु करता येणार नाही. शिक्षण उपसंचालक यांचे विषय मान्यतेच्या अधिकारावर निर्बंध असलेने या कार्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय कोणतेही नवीन विषय सुरु करण्यात येवू नयेत. तसेच विनापरवानगी विषय सुरु केला जावू नये. अन्यथा विदयार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस संबंधित मुख्याध्यापक व्यक्तीशः जबाबदार राहतील.

१०) विषयनिहाय व तुकडीनिहाय पटसंख्या भरताना ज्या विषयांच्या जादा तुकडया आहेत यामध्ये प्रथमतः पहिल्या तुकडया पूर्ण क्षमतेने भरलेनंतरच शेवटच्या तुकडीत उर्वरीत पटसंख्या भरावी.

११) एकापेक्षा जास्त तुकडया असल्यास इयत्तानिहाय, तुकडीनिहाय व विषयनिहाय कार्यभार तक्ता जोडावा.

**१२) शासन निर्णय दिनांक २८/८/२०१५ नुसार माध्यमिक कडील शिक्षक निश्चिती विदयार्थी पटसंख्येवर होत असलेने, माध्यमिक विभागाकडे कोणताही कार्यभार उच्च माध्यमिक शिक्षकांना देणेसाठी शिल्लक राहत नाही. माध्यमिक कडील कार्यभार धरुन उच्च माध्यमिक कडे मान्यताप्राप्त पूर्णवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांना उच्च माध्यमिक कडील त्याच क.म.वि. मधील व त्याच अनुदान प्रकारातील उर्वरीत विषयांचा कार्यभार देणेत येवून १७/१८ घ.ता. कार्यभार पूर्ण करावा. असा कार्यभार देताना संबंधित शिक्षकांची त्या विषयातील पदव्युत्तर पदवी (पर्यावरण विषय वगळून) असणे आवश्यक आहे. पूर्णवेळ साठी आवश्यक असणारा १७/१८ घ.ता. कार्यभार उच्च माध्यमिक शिक्षकांना उपलब्ध होत नसलेस अशी पदे व्यपगत होतील व त्यामुळे त्या पदावर कार्यरत मान्यताप्राप्त शिक्षक अतिरिक्त ठरु शकतील. सबब, क.म.वि. कडील उपलब्ध कार्यभार, मंजूर पदे, शिक्षकांची अर्हता विचारात घेवून कार्यभार वाटप करावा. यापूर्वी मान्यता असलेल्या शिक्षकांचा कार्यभारामध्ये बदल करावयाचा असल्यास त्याप्रमाणे संच मान्यतेवेळी लेखी माहिती , संबंधित शिक्षकांची शैक्षणिक अर्हता गुणपत्रके सादर करावीत. सदर बाबी तपासून निर्णय घेणेत येईल.**

१३) तसेच शासन निर्णय दिनांक २८/८/२०१५ नुसार माध्यमिक कडील शिक्षक निश्चिती विदयार्थी पटसंख्येवर होत असलेने, यापुढे उच्च माध्यमिक कडील कोणताही कार्यभार माध्यमिक शिक्षकांना देणेत येवू नये. असा कार्यभार माध्यमिक कडील पूर्णवेळ पदासाठी ग्राहय धरला जाणार नाही. उच्च माध्यमिक कडे शिल्लक कार्यभारावर घडयाळी तासिका तत्वावर विहित अर्हताधारक शिक्षक जाहीरात व इतर विहित कार्यपध्दती अवलंबून नव्याने नियुक्त करता येतील. पूर्णवेळ नियुक्त्या करता येणार नाहीत. अर्धवेळ नियुक्त्या या कार्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाहीत.

**सदर संच मान्यता प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे माहिती फाईलमध्ये सादर करावी.**

१४) संच मान्यतेची सन २०२१-२२ ची भरलेली कच्ची प्रत (ड्राफट प्रिंट) - तपासणीसाठी

१५) सन २०२१-२२ साठीचा इयत्ता, तुकडी , विषयनिहाय कार्यभार तक्ता ऑनलाईन संच मान्यतावरील

१६) २०२०-२१ ची मान्य करुन दिलेली संच मान्यता प्रत

१७) सन २०२१-२२ चा शाखानिहाय , तुकडीनिहाय विदयार्थी संख्येचा ऑनलाईन तक्ता तसेच एकूण मंजूर कार्यरत व रिक्त पदांचा तपशिल ऑनलाईन तक्ता सादर करावा.

१८) सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनंतर देणेत आलेल्या सर्व वैयक्तिक मान्यतेच्या प्रती (अनुदानित, विनाअनुदानित व २० टक्के अनुदान पात्र, पात्र घोषित कनिष्ठ महाविदयालये )

**१९) सन २०२१-२२ मधील सरल डाटाबेस वरील आधार कार्ड संख्ये विदयार्थी रिपोर्ट ( डिव्हीजनवाईज, स्ट्रिम वाईज, स्टँडर्ड वाईज –गोषवारा) प्रस्तावासोबत सादर करावेत. Student database - student portal – report - HM level- student report यामध्ये सदरचे रिपोर्ट मिळू शकतील. सरल डाटाबेस वरीलच आधार अपडेट असलेली विदयार्थी संख्या ग्राहय धरली जाईल यामुळे सदरचा रिपोर्ट न आणलेस आपली संच मान्यता करुन दिली जाणार नाही. (विदयार्थी संख्येसाठी अन्य रिपोर्ट/माहिती ग्राहय धरली जाणार नाही)**

२०) शाळा/संस्था अल्पसंख्याक असल्यास - अल्पसंख्याक प्रमाणपत्र

२१) मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मान्यतेचे पत्र

२२) सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनंतर या कार्यालयाकडून मंजूरी देणेत आलेल्या वर्ग/तुकडया/शाखा यांच्या प्रथम मान्यता इ. ११ वी /इ. १२ वी आदेशाच्या प्रती –( कायम विनाअनुदानित/स्वंयअर्थसहा. शाळा )

२३) सन २०२०-२१ साठी मान्यता दिलेले व सन २०२१-२२ साठी संस्थेने सेवासातत्य दिलेले अर्धवेळ/सीएचबी शिक्षकांचे मान्यता प्रस्ताव सदर शिबीरावेळी सादर करावेत. ( यामध्ये शिक्षक/शिक्षण सेवक मान्यता आदेश, सेवासातत्य ठराव, नियुक्ती आदेश, हजर रिपोर्ट, शैक्ष. अर्हता इ. )

२४) तक्ता ब मधून तक्ता अ मध्ये शिक्षकांची नावे समाविष्ट केल्यास त्यास संस्था ठराव असणे बंधनकारक राहील.

*२५) सन २०२१-२२ ची संच मान्यतेवर शिक्षण उपसंचालकांची स्वाक्षरी झाल्यानंतर त्याची मूळप्रत (ओरिजनल सही शिक्क्यासह) तसेच सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनंतर देण्यात आलेल्या पूर्णवेळ/अर्धवेळ वैयक्तिक मान्यतेच्या*

*प्रती संच मान्यतेच्या लिंकवर PDF format मध्ये Size 200 kb to 3 mb अपलोड करण्यात यावी.* (अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित व २० टक्के पात्र कनिष्ठ महाविदयालये)

- *संच मान्यता व सर्व वैयक्तिक मान्यता प्रती अपलोड करताना*
- ***PDF format File Name:- UdiseNo-Grant Type- College Name***
- ***( Ex. 27341307307 Grantable GKG College Kop)** फाईलचे नाव देऊन सेव्ह करणे*

२६) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे यांचेकडील पत्र दि. ४/३/२०२२ नुसार आधार क्रमांक आधारित संचमान्यता अंतिम केली जाईल. संच मान्यतेनंतर अतिरिक्त ठरणा-या शिक्षकांचे समायोजनासाठी १५ दिवसांत कार्यालयास माहिती सादर करावी.

२७) संच मान्यता प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी साक्षांकीत करावीत.

वरील प्रमाणे माहिती तसेच अन्य आवश्यक त्या माहितीसह सन २०२१-२२ च्या भरलेल्या माहितीची प्रत तसेच वर नमूद कागदपत्रे यांची फाईल तयार करुन खाली नमूद दिनांकास संच मान्यता शिबीरात स्वत: मुख्याध्यापक/प्राचार्य व माहितगार लिपिकासह उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

**संदर्भ क्र. १ च्या पत्रातील सूचनेनुसार सदर शिबीराचे वेळी संच मान्यता अंतिम करुन न घेतल्यास नोव्हेंबर २०२२ पासूनचे वेतन अदा करु नये अशा सूचना वेतन पथकास देणेत येतील. यामुळे होणा-या नुकसानीची/परिणामांची सर्व जबाबदारी प्राचार्य/ मुख्याध्यापक यांची राहील. तसेच शिबीराशिवाय संच मान्यता करुन दिल्या जाणार नाहीत याचीही नोंद घ्यावी.**

(महेश ज. चोथे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
अधीक्षक, वेतन व भ.नि.नि. पथक, माध्यमिक, कोल्हापूर विभाग.
सर्व सहा. शिक्षण उपनिरिक्षक (उच्च माध्यमिक) जि.प. कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/ सिंधुदुर्ग
प्रत- माहितीस्तव सविनय सादर
मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे

***सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यतेबाबत अनुदानित उच्च माध्य शाळा व त्यांना संलग्न विनाअनुदानित/स्वंय अर्थ सहा. वर्ग/तुकडया, २० टक्के अनुदानास पात्र कनिष्ठ महाविदयालये***
***पुरवणी संच मान्यता शिबीर- उर्वरीत क.म.वि.साठी***

| अ.क्र | जिल्हा | | दिनांक | शिबीर स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, गुहागर | १३/१०/२०२२ | अभ्यंकर कुलकर्णी ज्युनियर कॉलेज, रत्नागिरी |
| २ | | रत्नागिरी, राजापूर, लांजा | १४/१०/२०२२ | |
| ३ | सांगली | वाळवा, शिराळा, कवठेमहांकाळ, जत, आटपाडी | १८/१०/२०२२ | सांगली हायस्कूल, सांगली |
| ४ | | तासगाव, मिरज, सांगली शहर, | १९/१०/२०२२ | |
| ५ | | पलूस, खानापूर, कडेगाव | २०/१०/२०२२ | |

## शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

-: उच्च माध्यमिक विभाग :-

-सन २०२१-२२ पटपडताळणी तक्ता -

कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव-

युडाएस कोड-

दूरध्वनी क्र. मोबाईल क्र.

दिनांक ३०/१२/२०२१ ची पटसंख्या

| क्र | प्रकार | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | अनुदानित | मंजूर तुकडी संख्या | | | | | | | | | | |
| | | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | |

| क्र | प्रकार | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | २० टक्के टप्पा अनुदानित | मंजूर तुकडी संख्या | | | | | | | | | | |
| | | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | |

| क्र | प्रकार | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | विना अनुदानित | मंजूर तुकडी संख्या | | | | | | | | | | |
| | | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | |

| क्र | प्रकार | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | स्वंय अर्थ सहा/कायम विनाअनु | मंजूर तुकडी संख्या | | | | | | | | | | |
| | | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | |

| क्र | प्रकार | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | एकूणात- अनु+टप्पा+ विना+ स्वंय | मंजूर तुकडी संख्या | | | | | | | | | | |
| | | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | |

### प्रमापणपत्र

प्रमाणित करणेत येते की, वर दिलेली मंजूर तुकडया, विदयार्थी संख्या इ. माहिती ही जनरल रजिस्टर, शाळा सोडल्याचे दाखले, विद्यार्थी हजरी पत्रके व तुकडया मंजूरी आदेश इ. शालेय रेकॉर्डवरुन दिलेली असून ती खरी व तंतोतंत बरोबर आहे याची मी खात्री केली आहे. तसेच उपरोक्त प्रमाणे माहिती सरल मध्ये भरणेत आलेली आहे.

**सदरची माहिती चुकीची/खोटी आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.**

सही(नाव- ) प्राचार्य/मुख्याध्यापक